दिनांक 13/09/2022 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 33

विषय – नगरपरिषद कामकाजकामी सन 2022-2023 साठी चार्टड अकौंटन्ट ए.डी.शिकलगार आणि कंपनी यांचे दिनांक 02/08/2022 रोजीचे पत्रावर निर्णय घेणे.

संदर्भ – दिनांक 13/09/2022 रोजीची लेखापाल व मुख्याधिकारी यांची टिपणी.

नगरपरिषद कामकाजकामी सन 2022-2023 साठी चार्टड अकौंटन्ट ए.डी.शिकलगार आणि कंपनी यांनी दिनांक 02/08/2022 रोजीचे पत्राने विनंती केली आहे.नगरपरिषेदेकडील ठेकेदारांचे जीएसटी-टिडीएस भरणा करणे, लेख्यांच्या डबल ऐंन्ट्रीची नोंद करणे तसेच नगरपरिषद कर्मचारी यांचे आयकर भरणे इत्यादी कामकाजासाठी नगरपरिषद सर्वसाधारण सभा ठराव क्रं. 03 09/07/2021 ने चार्टड अकौंटन्ट ए.डी.शिकलगार आणि कंपनी यांची निविदा मंजूर केली होती.त्यानुसार सन 2022-2023 या वित्तीय वर्षासाठी सन 2021-2022 च्या दराप्रमाणेच ते काम करणेस तयार असलेने त्यांना सन 2022-2023 सालासाठी मुदतवाढ देणेत येत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा

दिनांक 13/09/2022 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 34

विषय – विटा नगरपरिषद मालकीचे नगरपरिषद ऑफीस इमारत ( उत्तरेकडील इमारत ) पहिला मजलामधील जागा (हॉल) शहर उपजिविका केंद्रास उपलब्ध करुन देणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ – दिनांक – 17/08/2022 रोजीची विभागप्रमुख व मुख्याधिकारी यांची मंजुर टिपणी.

दिनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र.DAY-NULM/SMID/CLC/10/D-11/2020-21/89 दिनांक – 07/01/2021 रोजीच्या पत्रान्वये शहर उपजिविका केंद्राची स्थापना करणेस स्थानिक स्वराज्य संस्थांना आदेशित केले आहे. सदर उपजिविका केंद्रामार्फत शहरातील मध्यम व उच्च उत्पन्न गटांना सेवा पुरविल्या जाणार आहेत. सुतारकाम, बागकाम,बांधकाम,विद्युत काम, नळकाम, आरोग्यसेवा इतर मजुर काम अशा व इतर विविध सेवा एकाच छताखाली देण्याचे काम या केंद्राकडून देण्यात येणार आहेत. तसेच स्वंयसहाय्यता बचत गटांच्या उत्पादनाला बाजार पेठ मिळवून देणे, उत्पादने विक्री ठेवणे या सेवा देण्यात येणार आहेत. त्याचबरोबर आधार केंद्र, सेतु सेवा केंद्र, विमा विषयक सेवा केंद्र व इतर विविध सुविधा केंद्रे यामार्फत चालविण्यात येणार आहेत. तसेच या केंद्रामार्फत शहरातील गरीब असंघटित उद्योजक, कारागीर यांची नोंदणी करुन त्यांना उपजिविकेच्या सेवा संधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. तरी याकामी शहरामध्ये शहर उपजिविका केंद्र स्थापन करणेसाठी नगरपरिषद मालकीचे नगरपरिषद ऑफीस इमारत (उत्तरेकडील इमारत) पहिला मजलामधील 1000 चौ.फुट मोजमापाचा हॉल विनाडिपॉझिट विनाभाडे तीन वर्षासाठी मोफत देणेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. याकामी आवश्यक ती पुढील नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा